'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 1
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March - 2014

# आदिवासी लोकगीत आणि ललित साहित्याचा अनुबंध

- गावीत विलास जयंत
संशोधक विद्यार्थी,
मराठी विभाग,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

आदिवासी समाजात काही कर्तृत्ववान पुरुषांची चरित्रे लिहिता येतील. ती लिहावयाची झाल्यास आदिवासी बोलीत प्रचलित असलेल्या लोकसाहित्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. कारण त्या व्यक्तीने केलेले कार्य, त्याचे गुण, दोष हे सगळे वर्णन आदिवासी लोकगीतांमधून आपल्याला प्रत्ययास येते. म्हणून चरित्र हे लोकदेवतांच्या लोकगीतामधूनच निर्माण झाले असावे, असे मानण्यास हरकत नाही. या लोकसाहित्यापासूनच मराठी साहित्यामध्ये चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन ही लिहायला सुरुवात झाली असावी.

आदिवासी समाज हा रानावनात व डोंगर दऱ्यामध्ये राहणारा समूह म्हणून ओळखला जातो. हा समाज नागरी संस्कृतीपासून दूर असलेला आहे. तो निसर्गपूजक आहे. इतर समाजापेक्षा आचार विचार, रूढी – परंपरा, अंधश्रध्दा यांच्यात गुरफटलेला आहे. या आदिवासी समाजात अनेक प्रकारचे लोकसाहित्य आढळून येतात. आदिवासी जमातींचा प्रदेश, बोली, पेहराव वेगवेगळा असला, तरी सांस्कृतिक अंत:प्रवाह मात्र समान आहे. भावभावना, संवेदना, निसर्गाशी तन्मयता, सामाजिक प्रवृत्ती, समूहजीवनाची ओढ, जन्म–विवाह–मृत्यू, सणवार साजरे करण्याच्या सामान्य पध्दती, निसर्गाबद्दल ऋणाची भावना ही सर्वांच्या लोकसाहित्यात समान आहे. प्रत्येक जमातीच्या रुढी, परंपरा, बोलीभाषा, त्यांच्या धारणा, त्यांच्या भावना लोकसाहित्यातून व्यक्त होतात, म्हणून तर अशा प्रकारची मौखिक सामग्री अभ्यासकाला प्राथमिक स्वरुपात लागते. लोकसाहित्य हे माणसाच्या प्रत्यक्ष जीवनाचे समग्र प्रकटीकरण आहे, म्हणूनच मानवाच्या जीवनापासून लोकसाहित्य वेगळे काढणे अशक्य आहे. मानवाचे अवघे जीवनच लोकसाहित्याने व्यापले आहे. लोकसाहित्याची सुरुवात ही मानवी जीवनापासूनच आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. माणासाची वर्तन परंपरा, वस्तू किंवा साधन परंपरा, मौखिक किंवा शब्द परंपरांचा विचार लोकसाहित्यात करावा लागतो. लोकधर्मविधी, लोकविज्ञान, लोकन्याय, लोकस्थापत्य, लोकभविष्य, समाज, राज्य, अर्थव्यवहार यासंबंधी लोकवाङ्मय, लोककला, लोकसंगीत ही लोकसाहित्याची अंगे आहेत. लोकसाहित्यात लोकगीते, लोककथा, लोकनाटय, लोकदेवता, म्हणी वाक्प्रचार, उखाणे या लोककलाप्रकारांचा समावेश होतो. या समाजात लोकदेवता या लोकसाहित्याच्या प्रकारामध्ये अनेक लोकदेवता आढळून येतात. त्यात आदिवासी समाजातील गावीत, वळवी, पाडवी, वसावे, नाईक या जमातीत 'खांबदेव' या देवतेची पूजा केली जात असताना लोकगीते म्हटली जातात. ज्याप्रमाणे लोकसाहित्यात लोकगीते, लोककथा, लोकनाटय यांचा संबंध ग्रंथसाहित्याशी जोडला जातो म्हणजे कथा, कादंबरी, कविता, नाटक

यांच्याशी अनुबंध प्रस्थापित करता येतो. त्याचप्रमाणे आदिवासी लोकसाहित्यामध्ये लोकदेवता या प्रकारात 'खांबदेव' या देवतेचे कथाबीज हे चरित्राशी जुळविता येते. म्हणून खांबदेवाचा थेट संबंध चरित्र, आत्मचरित्राशी येतो.

आदिवासी समाजातील गावीत, वळवी, पाडवी, वसावे, नाईक या विविध गटामध्ये लोकदेवता म्हणजे 'खांबदेव' या देवतेला महत्त्वाचे स्थान आहे. 'खांबदेव' म्हणजे एखादी व्यक्ती अनैसर्गिक मृत्यू म्हणजे अपघाती मृत्यू (पाण्यात, विहीरीत, तलावात बुडून मृत होणे, जळून मरणे, साप चावून मृत्यू होणे आत्महत्या करणे) यासारख्या पध्दतींनी व्यक्तीचा अकाली मृत्यू होतो. अशा व्यक्तीच्या नावाने खांब ठेवला जातो. प्रारंभी खांब ठेवण्याची तारीख ठरवली जाते. लाकूड अथवा उभा दगड शोधून त्यावर त्या व्यक्तीची प्रतिमा कोरली जाते. त्याच्या मृत्यूचे कारण आणि वृक्ष, नदी, सूर्य, चंद्र, साप आदि प्रतिमा कोरल्या जातात. प्रथम खांब तयार करण्यासाठी टाकला जातो. खांब ठेवण्याच्या एक दिवस आधी तो तिथून आणायचा असतो. पण त्यापूर्वी भगत आणि नातेवाईक ती व्यक्ती जिथे मृत झाली असेल त्या स्थळी जाऊन त्या व्यक्तीचा जीव आणतात. दुसऱ्या दिवशी खांबाची भगतसहित मिरवणूक निघते. तो खांब गावात कुठेही लपवतात आणि भगताने तो अचूक शोधायचा असतो. याप्रसंगी पारंपरिक विधी गीते गाईली जातात. खांब स्त्रीचा असेल तर केरसुणीपासून संसारोपयोगी सर्व वस्तू आणि पुरूष असेल तर शेतीची अवजारे, धनधान्य सर्व सर्व सोबत दिले जाते आणि भगताला विचारून निश्चित केलेल्या जागेवर तो खांब ठेवतात. भगत जर खरोखरच तंत्र – मंत्र विद्या जाणणारा असेल तर त्या मृत व्यक्तीला मुक्ती मिळते.असा समज आदिवासी समाजात रूढ आहे. भगताच्या विद्येत जर उणीव असेल तर ती व्यक्ती छळते. छळण्याचे कारण स्थानापन्न होण्याची जागा बरोबर नसणे, किंवा एखादी वस्तू देण्याचे राहून जाणे ही कारणे असतात. मग हे पुन्हा भगतामार्फत करावे लागते. तसेच मृत पावलेल्या व्यक्तीने समाजासाठी व गावासाठी, कुटुंबासाठी विशेष योगदान दिल्याबद्दल निधन पावलेल्या व्यक्तीच्या कार्याच्या स्वरुपात लोकगीते गायली जातात. तसेच त्या व्यक्तीचे कार्य, गुण, अवगुण इ. वेगवेगळे गुणवैशिष्टये त्या व्यक्तीबद्दल सांगितली जातात व त्याच्याच स्मृतीप्रीत्यर्थ सोंगाडया पार्टी व भजनमंडळी या लोककलाकरांना बोलावून त्या व्यक्तीचे गुणगान गायले जाते. 'भजन मंडळात' तर रात्रभर त्याने केलेले कार्ये भजनाद्वारे सांगितली जातात. या कार्यक्रमाला सर्व गावातील लोक, नातेवाईक, सर्व मंडळी उपस्थित राहतात. त्याच्या आठवणीमध्ये सहभागी होतात व त्यांच्या कुटुंबातील कार्यक्रमाला हातभार लावतात. अशा प्रकारे खांबदेवाची पूजाविधी आदिवासीमध्ये रूढ आहे.

ज्याप्रमाणे दर बारा कोसावर भाषा बदलते त्याप्रमाणे वेगवेगळया तालुक्यामध्ये या खांबदेवाची नावे बदलतात. काही ठिकाणी 'खांबदेव', 'पाटली', 'पाल्या' अशीही नावे आहेत. या 'खांबदेव' विषयी जे लोकगीत गायले जाते त्या गाण्यामध्ये विरहभावना, शोकस्थिती त्याने केलेले कार्याचे वर्णन इ. वैशिष्टये आढळून येतात.

उदा.-

ओ सोन्या डाअया निंगी गियो देव लोकुमे....
कोअ बा हुनो पोडयो
पोयरे सोयरे हुने पोडये
खेतीवाडी हुनी पडी
ओ सोन्या डाअया निंगी गियो देव लोकुमे....
बादहाल मदत केएणारो रा
सुख दुखाम बादहाल सांभाळणारो रा
तू आथो ता सुख शांती आथी
ओ सोन्या डाअया निंगी गियो देव लोकुमे....
गावूमें बादहाल ओहावतलो
आमी तो शिवाय हुनो पोडयो गाव
आपू गावूम तो सावली पाडतो रेजे
ओ सोन्या डाअया निंगी गि यो देव लोकुमे....

मराठी भाषांतर

ऐ सोन्या निघून गेला तू देव लोकांमध्ये
घरदार रिकामे पडले
मुलं बाळ एकटी पडली
शेतीवाडी सांभाळणारा कोणी नाही
ऐ सोन्या निघून गेला तू देव लोकांमध्ये
सगळयांना मदत करणारा
सुख दु:खात सांभाळणारा
तू होता तेव्हा सुख शांती होती
ऐ सोन्या निघून गेला तू देव लोकांमध्ये
गावात सगळयांना हसवत होतास
आता तुझ्याविना सामसुम झाले गाव
आपल्या गावात सदैव तुझी छाया राहू दे
ऐ सोन्या निघून गेला तू देव लोकांमध्ये

वरील लोकगीतातून लोकसाहित्य व ग्रंथसाहित्य यांचा अनुबंध जर तपासला तर ग्रंथसाहित्यामधला चरित्र हा प्रकार आदिवासी लोकसहित्य या लोकदेवतेच्या लोकगीतातून अनुभवयास येतो. म्हणून चरित्र ह्या प्रकाराची कथाबीजे आदिवासी लोकदेवतेच्या लोकगीतांमध्ये आढळून येतात. म्हणून जी महापुरुषांची किंवा इतरांची चरित्रे लिहिली गेली त्यावरुन असे म्हणता येते की ती लोकगीतांवरुनच लिहिली गेली असावीत. शिवाजी महाराज, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडीत नेहरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा महापुरुषांची चरित्र मराठीत लिहिलेली आढळतात. आदिवासी समाजात काही कर्तृत्ववान पुरुषांची चरित्रे लिहिता येतील. ती लिहावयाची झाल्यास आदिवासी बोलीत प्रचलित असलेल्या लोकसाहित्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. कारण या लोकगीतांमध्ये त्या व्यक्तीने केलेले कार्य, गुण, दोष हे सगळे वर्णन या लोकगीतांमधून आपल्याला प्रत्ययास येतात. म्हणून चरित्र हे लोकदेवतांच्या लोकगीतामधूनच निर्माण व्हावे, असे मानण्यास हरकत नाही. या लोकसाहित्यापासूनच मराठी साहित्यामध्ये चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन ही लिहायला सुरुवात झाली असावी. जसे की, लोकसाहित्यातील लोकगीत, लोकनाटय, लोककथा या प्रकारांचा मराठी साहित्य प्रकारावर जसा परिणाम झाला तसाच परिणाम आदिवासी लोकसाहित्यातील लोकदेवातांच्या लोकगीतांचा व इतर लोकगीतांचाही होऊ शकेल.

संदर्भग्रंथ –

1. पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य – पुष्पा गावीत

2. आदिम जीवनाविष्कार – माहेश्वरी गावीत

3. आदिवासी विशेषांक - माहेश्वरी गावीत

4. लोकसाहित्य संकल्पना आणि स्वरुप – मोहन पाटील

5. लोकसाहित्य एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र – गंगाधर मोरजे

6. लोकसाहि त्य संकल्पना व स्वरुप – शरद व्यवहारे